# खाद्य संस्कृती टिकवण्यासाठी फूड फेस्टिव्हल आवश्यक : लाड



कुंडल : फूड फेस्टिवलचे उद्‌घाटन करताना शरद लाड.

वार्ताहर
कुंडल

खाद्य संस्कृती टिकवायची असेल तर महाविद्यालयीन जीवनात फूड फेस्टिवल सारखे उपक्रम राबविले पाहिजेत. यातूनच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळेल, असे मत माजी जिल्हा परिषद सदस्य शरद लाड यांनी व्यक्त केले. ते कुंडल येथे क्रांती महिला प्रतिष्ठान आणि क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड कला महाविद्यालयकडून फूड फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी बोलत होते. यावेळी क्रांती महिला प्रतिष्ठानच्या धनश्रीताई लाड, रणजित लाड, विक्रांत लाड, प्राचार्य डॉ. प्रताप लाड उपस्थित होते.

यावेळी शरद लाड म्हणाले, फक्त अभ्यास न करता महाविद्यालयातील प्रत्येक उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. यावेळी मुख्याध्यापक सी. वाय. जाधव, एस. डी. लाड, पूजा लाड, प्राजक्ता जाधव, वैशाली मोहिते आदी उपस्थित होते.

दै. लोकमत 27/05/2022



कुंडल (ता. पलूस) येथे क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. (बापू) लाड यांचा ७७ वर्षापूर्वी झालेला ऐतिहासिक क्रांतिकारी विवाहसोहळा कलाकारांकडून महानाट्याद्वारे साकारण्यात आला. दै. तरुण भारत 27/5/22

# कुंडलकरांनी दिला जी. डी. बापूंच्या क्रांतिकारी विवाहाला नाट्यउजाळा

## ऐतिहासिक महानाट्याच्यानिमित्ताने क्रांतिवीरांचे स्मरण

लोकमत न्यूज नेटवर्क

पलूस : 'माझी सहचारिणी होणं म्हणजे साक्षात अग्निकुंडात उडी मारल्यासारखं आहे,' असे जी. डी. बापू लाड म्हणत असतानाही, 'वनवासी रामाची सीता होण्याचे पत्करीन' असे म्हणत विजयाकाकूंनी लग्नाला होकार दिला आणि २५ मे १९४५ रोजी पुरोगामी पद्धतीने या वधू-वरांनी एकमेकाला केवळ रक्ताचा टिळा लावून क्रांतिकारी विवाहसोहळा पार पडला. या ऐतिहासिक सोहळ्याच्या आठवणी महानाट्याच्या रूपाने बुधवारी कुंडलकरांनी जागविल्या.

कुंडल (ता. पलूस) येथे जी. डी. बापू लाड यांच्या जन्मशताब्दीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. य नाट्याने प्रेक्षकही भारावले. क्रांतिकार्यात स्वतःला झोकून दिलेल्या बापूंनी इंग्रजांचे सैन्य मागावर असताना २५ मे १९४५ रोजी कोणत्याही चाली-रीती न मानता, विजयाकाकूंना खंजीराने स्वतःच्या रक्ताचा टिळा लावून रात्री बारा वाजता लग्न केले होते. या आठवणी महानाट्यातून जागविण्यात आल्या.

यावेळी आ. अरुण लाड म्हणाले, बापू आयुष्यभर समाजासाठी जगले. त्यांनी कोणताही डामडौल मिरवला नाही. जन्मशताब्दीनिमित्ताने त्यांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी, यासाठी महानाट्याचे आयोजन केले आहे. यातून क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापूंचा गौरवशाली इतिहास जागविला जाईल. या महानाट्याच्या निमित्ताने क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथअण्णा नायकवडी, आप्पासाहेब लाड यांच्यासह क्रांतिवीरांचे स्मरण केले.

यावेळी क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, उद्योजक उदय लाड, दिलीप लाड, स्वातंत्र्यसैनिक विरुपाक्ष लुपणे, माजी सरपंच वसंत लाड, सुभाष पवार, व्ही. वाय. पाटील, पोपट संकपाळ, राज्यस्तरीय माळी महासंघाच्या जिल्हाध्यक्ष सच्चना माळी, माजी उपसभापती अरुण पवार, सरपंच प्रमिला पुजारी उपस्थित होते.

### तो विवाह नव्हे, बंड!

बापू व विजयाकाकूंचा विवाहसोहळा म्हणजे फक्त विवाह नसून, ते तुफान सेनेच्या सैनिकांच्या उपस्थितीत इंग्रजांच्या नाकावर टिच्चून पुकारलेले बंड होते. यातूनच स्फुल्लिंग पेटून स्वातंत्र्यसैनिकांना प्रोत्साहन मिळाले, असे यावेळी अरुण लाड म्हणाले.

दै. लोकमत 27/05/2022



कुंडल (ता. पलूस) येथे क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. (बापू) लाड यांचा ७७ वर्षापूर्वी झालेला ऐतिहासिक क्रांतिकारी विवाहसोहळा कलाकारांकडून महानाट्याद्वारे साकारण्यात आला. दै. तरुण भारत 27/5/22

# कुंडलकरांनी दिला जी. डी. बापूंच्या क्रांतिकारी विवाहाला नाट्यउजाळा

## ऐतिहासिक महानाट्याच्यानिमित्ताने क्रांतिवीरांचे स्मरण

लोकमत न्यूज नेटवर्क

पलूस : 'माझी सहचारिणी होणं म्हणजे साक्षात अग्निकुंडात उडी मारल्यासारखं आहे,' असे जी. डी. बापू लाड म्हणत असतानाही, 'वनवासी रामाची सीता होण्याचे पत्करीन' असे म्हणत विजयाकाकूंनी लग्नाला होकार दिला आणि २५ मे १९४५ रोजी पुरोगामी पद्धतीने या वधू-वरांनी एकमेकाला केवळ रक्ताचा टिळा लावून क्रांतिकारी विवाहसोहळा पार पडला. या ऐतिहासिक सोहळ्याच्या आठवणी महानाट्याच्या रूपाने बुधवारी कुंडलकरांनी जागविल्या.

कुंडल (ता. पलूस) येथे जी. डी. बापू लाड यांच्या जन्मशताब्दीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. य नाट्याने प्रेक्षकही भारावले. क्रांतिकार्यात स्वतःला झोकून दिलेल्या बापूंनी इंग्रजांचे सैन्य मागावर असताना २५ मे १९४५ रोजी कोणत्याही चाली-रीती न मानता, विजयाकाकूंना खंजीराने स्वतःच्या रक्ताचा टिळा लावून रात्री बारा वाजता लग्न केले होते. या आठवणी महानाट्यातून जागविण्यात आल्या.

यावेळी आ. अरुण लाड म्हणाले, बापू आयुष्यभर समाजासाठी जगले. त्यांनी कोणताही डामडौल मिरवला नाही. जन्मशताब्दीनिमित्ताने त्यांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी, यासाठी महानाट्याचे आयोजन केले आहे. यातून क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापूंचा गौरवशाली इतिहास जागविला जाईल. या महानाट्याच्या निमित्ताने क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथअण्णा नायकवडी, आप्पासाहेब लाड यांच्यासह क्रांतिवीरांचे स्मरण केले.

यावेळी क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, उद्योजक उदय लाड, दिलीप लाड, स्वातंत्र्यसैनिक विरुपाक्ष लुपणे, माजी सरपंच वसंत लाड, सुभाष पवार, व्ही. वाय. पाटील, पोपट संकपाळ, राज्यस्तरीय माळी महासंघाच्या जिल्हाध्यक्ष सच्चना माळी, माजी उपसभापती अरुण पवार, सरपंच प्रमिला पुजारी उपस्थित होते.

### तो विवाह नव्हे, बंड!

बापू व विजयाकाकूंचा विवाहसोहळा म्हणजे फक्त विवाह नसून, ते तुफान सेनेच्या सैनिकांच्या उपस्थितीत इंग्रजांच्या नाकावर टिच्चून पुकारलेले बंड होते. यातूनच स्फुल्लिंग पेटून स्वातंत्र्यसैनिकांना प्रोत्साहन मिळाले, असे यावेळी अरुण लाड म्हणाले.